महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर
५३९, राजेंद्रनगर,कोल्हापूर - ४१६ ००४.

दुरध्वनी क्र - ०२३१ - २६९६१०१/२/३ Website-www.sscboardkolhapur.in Email Id- divsec.kop@gmail.com

क्र.कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./2952
दिनांक - २३.०१.२०२४

प्रति,

मुख्याध्यापक,
सर्व मान्यताप्राप्त माध्यमिक शाळा,
सातारा/सांगली/कोल्हापूर.

**विषय :- माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र परीक्षा ( इ.१०वी ) फेंब्रुवारी - मार्च २०२४ तोंडी, प्रात्यक्षिक, श्रेणी परीक्षेचे साहित्य स्वीकारण्याबाबत.**

**संदर्भ :- १) क्र. कोविमं/ए-१ गोपनीय/प्रा.प./२९५४ दिनांक - २०/०१/२०२४**

माध्यमिक शालान्त प्रमाणपत्र ( इ.१०वी ) फेंब्रुवारी-मार्च २०२४ परीक्षेच्या शास्त्र,तंत्र,आणि व्यावसायिक विषयांची प्रात्यक्षिक परीक्षा तसेच भाषा विषयांची तोंडी परीक्षा दिनांक १०/०२/२०२४ ते २९/०२/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. तरी प्रात्यक्षिक परीक्षेचे साहित्य शुक्रवार दिनांक -०२/०२/२०२४ रोजी सकाळी १० ते ४ यावेळेत वितरण केंद्रावर वितरीत करण्यात येणार आहे. तरी सदरचे साहित्य स्विकारणेसाठी अधिकार पत्रासह प्रतिनिधी पाठवावा. सदर साहित्य घेतल्यानंतर ते बरोबर असल्याची खात्री करावी. साहित्य कमी/जास्त असल्यास तात्काळ विभागीय मंडळाशी / वितरण केंद्र प्रमुखाशी संपर्क साधण्यात यावा. त्यानंतरच वितरण केंद्र सोडावे. नंतर कोणतीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी. तसेच प्रात्यक्षिक,तोंडी,श्रेणी परीक्षा झाल्यानंतर त्याचे सर्व साहित्य व ऑनलाईन भरलेले गुणतक्ते वितरण केंद्रावर जमा करण्याची तारीख यथावकाश मंडळाच्या संकेतस्थळावरुन कळविण्यात येईल.

( सुभाष रा.चौगुले )
विभागीय सचिव,
कोल्हापूर विभागीय मंडळ, कोल्हापूर

**प्रत माहितीसाठी,**

१) शिक्षण उपसंचालक, कोल्हापूर
२) शिक्षणाधिकारी (माध्य) सांगली, सातारा, कोल्हापूर

**प्रत माहितीसाठी तथा कार्यवाहीसाठी,**

मुख्य जिल्हा वितरण केंद्र प्रमुख
सांगली,सातारा,कोल्हापूर

यांना कळविण्यात येते की मा.शा.प्र.परीक्षा फेब्रु-मार्च-२०२४ परीक्षेचे प्रात्य. तोंडी परीक्षेचे साहित्य घेऊन मंडळाचे प्रतिनिधी गुरुवार दि. ०१/०२/२०२४ रोजी आपल्याकडे येणार असून सदर साहित्य शुक्रवार दि. ०२/०२/२०२४ रोजी वितरीत करण्यात यावे. तसेच सदर साहित्य घेऊन न गेलेल्या शाळांना संपर्क साधुन १००% साहित्य वितरीत करण्यात यावे व साहित्य वितरण केलेली पोहोच नंतर विभागीय मंडळात जमा करावी.